या विभागाच्या अधिपत्याखालील
जिल्हापरिषद स्तरावर कार्यान्वित
करण्यात आलेल्या पाणीपुरवठा विभाग
व उप विभागावरील कार्यकारी अभियंता/
उप अभियंता यांच्या नेमणुका करणे

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन निर्णय क्र.ग्रापापु-१०९७/प्र.क्र.४१/पापु-०७**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२**
**दिनांक :- ३ डिसेंबर, १९९८**

**वाचा :-** १) शासन निर्णय, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, क्र.ग्रापापु-१०९३/प्र.क्र.८१९/पापु ०७, दिनांक ६ मार्च, १९९७
२) शासन निर्णय, पाटबंधारे विभाग क्र.बीएजी-१०७०-ई (एक), दिनांक १९ डिसेंबर, १९९७

**प्रस्तावना :-** राज्य शासनाने राज्यातील पिण्याच्या पाण्याच्या कार्यक्रमाचा वाढता व्याप विचारात घेऊन मंत्रालय स्तरावर पाणीपुरवठा व स्वच्छता या विभागाची निर्मिती केली आहे. विभागाच्या पुनर्रचनेनंतर राज्यातील संपुर्ण पिण्याच्या पाणी पुरवठा कार्यक्रम हे या विभागाच्या अधिपत्याखाली आले असून या संपूर्ण पाणी योजनेची क्षेत्रीय स्तरावरील तांत्रिक यंत्रणा ही महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या अखत्यारित आणण्यात आली आहे. तसेच जिल्हा परिषदांमध्ये ग्रामीण पाणीपुरवठा कार्यक्रमासाठी ८ विभाग आणि ४३ उप विभाग नव्याने निर्माण करण्यात आले असून पूर्वीच्या लघुपाटबंधारे विभागाअंतर्गत हे काम पहाणारे ९ विभाग व ६० उप विभागदेखील हा कार्यक्रम राबविण्यासाठी कर्मचारीवृंदासह या विभागाच्या अधिपत्याखाली आणण्याचा संदर्भित शासन आदेशान्वये निर्णय घेण्यात आलेला आहे. आणि आता त्यामुळे या विभाग व उप विभागावरील कार्यकारी अभियंता व उप उपभियंता यांच्या नेमणुका हयादेखील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून करण्यात येणार असल्याने सध्या लघुपाटबंधारे विभागाकडे या कार्यक्रमासाठी कार्यरत असलेले कनिष्ठ अभियंता/शाखा अभियंता या वर्ग-३ मधील तांत्रिक कर्मचा-यांची पदोन्नतीची संधी त्यामुळे कमी होणार आहे. कारण अशा नेमणुका महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून करण्याची तरतूद जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ आणि महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अधिनियम १९७६ मध्ये नसल्यामुळे अशा नेमणुका प्राधिकरणास करणे शक्य होत नव्हते. यासाठी सबंधित अधिनियमामधील आणि संबंधित कलमामध्ये आवश्यक त्या तरतुदी करण्यासंबंधीचा अध्यादेश राज्यपालांनी दिनांक १३ नोव्हेंबर, १९९८ रोजी प्रख्यापित केलेला आहे. या अध्यादेशाची प्रत सोबत जोडली आहे. उक्त अध्यादेशान्वये संबंधित अधिनियमामध्ये दुरुस्ती केली असल्यामुळे शासन या संबंधाने खालील आदेश प्रसृत करीत आहे :-



१२७

**शासन निर्णय :-** जिल्हा परिषदांमध्ये नेमण्यात आलेल्या कनिष्ठ अभियंता आणि शाखा अभियंता यांना उप अभियंता पदी पदोन्नती ही पाटबंधारे विभागाच्या आस्थापनेवर त्या पदांसाठी विहित केलेल्या सेवाप्रवेश नियमानुसार पदोन्नतीने त्याचप्रमाणे नामनिर्देशनाने नेमणूक केली जात असे. परंतु वर प्रस्तावनेत म्हटल्याप्रमाणे या पाणी पुरवठा कार्यक्रमाचे पूर्ण नियंत्रण हे या विभागाच्या अधिपत्याखालील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून करण्यात येणार असल्याने उप अभियंता पदावरील नेमणुका हया प्राधिकरणामार्फत करण्यात येणार आहेत. आणि त्यासाठी सुधारीत आकृतिबंधानुसार जिल्हा परिषदेअंतर्गत जे कनिष्ठ अभियता/शाखा अभियंता कार्यरत आहेत. त्यांना वरीलप्रमाणे म्हणजेच उप अभियंता पदावर महराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून निवडीने नेमणूकीचा विचार करण्यासाठी खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून निर्णय घेण्यास शासन या आदेशान्वये मान्यता देत आहे :-

१) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाअंतर्गत आस्थापनेवरील उपलब्ध उपअभियंत्यांची पदे आणि जिल्हा परिषद स्तरावर ग्रामीण पाणी पुरवठा विभाग व उपविभाग उपलब्ध असलेली उप अभियंताची पदे ही महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या आस्थापनेवर नेमणुकीसाठी उपलब्ध होणार आहेत.

२) वर अनुक्रमांक १ मध्ये नमूद केल्याप्रमाणे उपलब्ध पदांपैकी प्राधिकरणाच्या विद्यमान सेवाप्रवेश नियमानुसार ३४ टक्के पदे ही नामनिर्देशनाने भरण्यासाठी उपलब्ध रहातील व उर्वरित पदे पदोन्नतीसाठी व निवडीने नेमणुका करण्यासाठी उपलब्ध असणार आहेत.

३) वर अनुक्रमांक २ येथे नमूद केल्याप्रमाणे उपलब्ध असलेल्या पदांवर निवडीने नेमणुका देण्यासाठी जिल्हा परिषदेअंतर्गत कनिष्ठ अभियंता/शाखा अभियंता यांना खालील गुणोत्तरानुसार पदे उपलब्ध असतील ते गुणोत्तर पुढीलप्रमाणे :-

| | | | | |
|---|---|---|---|---|
| जिल्हा परिषदेमधील ग्रामीण पाणीपुरवठा कार्यक्रमासाठी मंजूर केलेली वर्ग-२ ची पदे संवर्गातील एकूण पदे | x | संवर्गातील पदोन्नती व निवडीने नेमणुका करण्यासाठी राखून ठेवलेली पदे | = | जिल्हा परिषदांमधील कनिष्ठ अभियंता/शाखा अभियंता यांना निवडीने नेमणुकीकरिता उपलब्ध असलेली पदे |

वरील गुणोत्तरानुसार जिल्हा परिषदेतील ग्रामीण पाणीपुरवठा विभाग/उपविभागातील एकूण उपअभियंत्यांच्या पदांपैकी राज्यातील जिल्हा परिषदेअंतर्गत कनिष्ठ अभियंता/शाखा अभियंता यांना उप अभियंता पदावर निवडीने नेमणुका देण्यासाठी उपलब्ध राहतील.

४) मात्र जिल्हा परिषदेअंतर्गत या योजनेखाली उप अभियंता पदावर निवडीने नेमणुका देताना जिल्हा परिषदेमधील कनिष्ठ अभियंता/शाखा अभियंता यांना या पदोन्नतीसाठी विकल्प देणे आवश्यक आहे. त्यानुसार जे शाखा अभियंता/कनिष्ठ अभियंता हे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे येऊ इच्छितात वा यथास्थिती जे कनिष्ठ अभियंता/शाखा अभियंता लघु पाटबंधारे विभागाअंतर्गत पाटबंधारे विभागाकडे जावू इच्छितात त्यांचा विकल्प

संबंधित जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिका-यांनी या आदेशाच्या दिनांकापासून १ महिन्याच्या कालावधीत विचारात घेणे आवश्यक आहे आणि त्यानुसार जे कनिष्ठ अभियंता/शाखा अभियंता हे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे येऊ इच्छितात त्यांची जिल्हानिहाय निवडसूची गोपनीय अभिलेख धारिकेसह ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडे पाठविण्यात यावी.

५) वर अनुक्रमांक ४ येथे नमूद केल्याप्रमाणे सर्व जिल्हा परिषदांची एकत्रित सामाईक ज्येष्ठतासूची ग्रामविकास व जलसंधारण विभागाने तयार करुन गोपनीय अभिलेख धारिकेसह महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास उपलब्ध करुन देण्यात यावी.

६) जे शाखा अभियंता/कनिष्ठ अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील उप अभियंता पदी निवडीने नेमणूक देण्याचा विकल्प देतील. त्यांचा भविष्यामध्ये जिल्हा परिषदेशी/शासनाशी कोणताही संबंध राहणार नाही. त्यांना ग्रामविकास व जलसंधारण विभागाने तयार केलेल्या संयुक्त निविडसूचीच्या आधारे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडील उप अभियंता पदावर व त्यानंतर पुढील पदावर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सेवाप्रवेशातील तरतुदीनुसार पदोन्नतीच्या संधी उपलब्ध राहतील.

७) नवीन मंजूर होणारी पदे त्याचबरोबर रिक्त होणारी पदे दर दोन वर्षाने आढावा घेऊन वरील गुणोत्तरानुसारच भरण्यात येतील.

८) वर अनुक्रमांक१ ते ७ येथे दर्शविलेली कार्यपध्दत अनुसरताना आणि महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या अभियंता संवर्गासाठी सुधारीत सेवाप्रवेश नियम अंतिम होईपर्यंत जिल्हा परिषदेतीलअभियंता श्रेणी-३ मधील कर्मचा-यांच्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या आस्थापनेवर निवडीने नेमणुका करताना पाटबंधारे विभागाचे दिनांक १९ डिसेंबर, १९७० च्या आदेशान्वये विहित केलेले सेवाप्रवेश नियमच लागू राहतील.

२. या विभागाच्या पुर्नरचनेनंतर जिल्हा परिषद स्तरावर जे पाणी पुरवठा विभाग व उप विभाग या विभागाच्या अधिपत्याखाली कार्यान्वित करण्यात आल्यानंतर जिल्हा परिषदेमध्ये सेवेत असलेल्या कनिष्ठ अभियंता/शाखा अभियंता यांना वर विहित केलेल्या अटी व शर्तीच्या अधीन राहून त्यांना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील उप अभियंता पदी निवडीने नेमणूक करण्यासंबंधीचा विचार केला जाईल, परंतू विभागाच्या पुनर्रचनेनुसार जे कनिष्ठ अभियंता आणि शाखाअभियंता हे स्थानिकरित्या सक्षम अधिका-यांकडून म्हणजेच जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिका-यांकडून नव्याने नेमले जातील त्यावेळी मुख्य कार्यकारी अधिका-यांनी त्यांना नेमणुका देतानाच जिल्हा परिषदेच्या प्रशासकीय सोयीनुसार कनिष्ठ अभियंता आणि शाखा अभियंता यांना यथास्थिती पाणी पुरवठा कार्यक्रम त्याचबरोबर लघु पाटबंधारे कार्यक्रमामध्ये नेमणुका देण्यात आल्यानंतर त्यांचे ते विभाग त्याप्रमाणेच पुढे कायम राहतील किंवा कसे याबाबतचा निर्णय संबंधीत जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिका-यांनी घेतल्यास अशा कनिष्ठ अभियंता आणि शाखा अभियंता यांच्या बाबतीत विकल्प घेण्याचा प्रश्न निर्माण होणार नाही. म्हणजेच थोडक्यात पाणी पुरवठा विभाग व उप



९२८

विभागामधील सर्व कनिष्ठ अभियंता/शाखा अभियंता हे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील उप अभियंता पदी आपोआप निवडीने नेमणुकीस पात्र राहतील.

३. कनिष्ठ अभियंता/शाखा अभियंता म्हणजेच जिल्हा परिषदांमधील अभियंता श्रेणी-३ मधील कर्मचा-यांना वरीलप्रमाणे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या आस्थापनेवर निवडीने नेमणुका करण्यापुर्वीच्या कालावधीमधील सेवा आणि त्यानंतर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील कार्यकारी अभियंता/उप अभियंता हे ज्या कालावधीसाठी जिल्हा परिषद सेवेमध्ये नियुक्त केले जातील त्या कालावधीतील रजावेतन मृत्यू-नि-सेवा उपदान आणि सेवानिवृत्ती वेतन अंशदानाचे आर्थिक दायित्व शासनाचे राहील.

४. सर्व जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिका-यांनी दिनांक १३ नोव्हेंबर, १९९८ रोजी यासंबंधाने राज्यपालांनी प्रख्यापित केलेला सोबतचा अध्यादेश सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून त्याप्रमाणे आणि वर सूचित केल्याप्रमाणे पुढील कार्यवाही करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**(रु. न. देशमुख)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) विभागीय आयुक्त, (सर्व)
२) सर्व जिल्हाधिकारी
३) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
४) सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, एक्सप्रेस टॉवर्स, मुंबई
५) संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
६) मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
७) विभागीय उपसंचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा (सर्व)
८) अधीक्षक अभियंता तथा जिल्हा पाणी पुरवठा अधिकारी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
९) सर्व जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा
१०) कार्यकारी अभियंता,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
११) कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद (सर्व)
१२) उप अभियंता, पाणी पुरवठा व स्वच्छता उप विभाग, जिल्हा परिषद (सर्व)
१३) महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई (लेखा परिक्षा/लेखा अनुज्ञेयता)
१४) महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर (लेखा परिक्षा/ लेखा व अनुज्ञेयता)
१५) जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व)
१६) मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई
१७) उप मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा (सर्व)
१८) वित्त विभाग (व्यय-३, अर्थसंकल्प-१६)
१९) ग्राम विकास व जल संधारण विभाग/पाटबंधारे विभाग
२०) पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कार्यासन अधिकारी
२१) निवडनस्ती (पापु-०७), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

असा क्र. ४२ रजिस्टर्ड नं.एमएच/एमबीआय-साऊथ/२०/९८

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

**प्राधिकृत प्रकाशन**

शुक्रवार, नोव्हेंबर १३, १९९८/कार्तिक २२, शके १९२०

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग चार

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम**

**अनुक्रमणिका**

| | |
|---|---|
| | **पृष्ठे** |
| **सन १९९८ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १३.**--- महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ आणि महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अधिनियम, १९७६ यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता अध्यादेश. | ५९६-५९९ |

**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १३ नोव्हेंबर, १९९८

**MAHARASHTRA ORDINANCE No. XIII OF 1998.**

AN ORDINANCE FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA ZILLA PARISHAD AND PANCHAYAT SAMITI ACT, 1961, AND MAHARASHTRA JEEVAN AUTHORITY ACT, 1976.

**सन १९९८ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १३.**

**महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ आणि महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अधिनियम, १९७६ यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता अध्यादेश.**

१९६२ चा महा. ५. १९७६ चा महा. ४८

**ज्याअर्थी**, राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही ; **आणि ज्याअर्थी,** यात पुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ आणि महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अधिनियम, १९७६ यात आणखी सुधारणा करण्याकरिता महाराष्ट्राच्या राज्यपालांनी त्वरित कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल महाराष्ट्राच्या राज्यपालांची खात्री पटली आहे ;

**त्याअर्थी, आता,** भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ च्या खंड (१) व्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, महाराष्ट्राचे राज्यपाल, याव्दारे, पुढील अध्यादेश प्रख्यापित करीत आहेत :-

१. **संक्षिप्त नाव व प्रारंभ---** (१) या अध्यादेशास महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या आणि महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सुधारणा) अध्यादेश, १९९८ असे म्हणावे.

(२) तो ताबडतोब अंमलात येईल.

२. **सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ वाच्या कलम २३९ ची सुधारणा.---** महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ (यात यापुढे ज्याचा निर्देश " मुख्य अधिनियम " असा करण्यात आला आहे) याच्या कलम २३९ मध्ये,--- १९६२ चा महा.५

(१) खंड (ब) च्या नंतर, पुढील खंड जादा दाखल करण्यात येईल :-

" (क) (एक) जिल्हा परिषदेने, जिल्हा परिषदेतील सेवांच्या निकडींनुसार, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (यात यापुढे ज्याचा निर्देश " प्राधिकरण " असा करण्यात आला आहे) आणि संबंधित जिल्हा परिषद ठरवतील अशा संख्येने व अशा कालावधीकरिता आणि अशा अटी व शर्तीस अधीन राहून आपल्या आस्थापनेमध्ये प्राधिकरणातील अभियंत्यांच्य संवर्गातून उप अभियंते (वर्ग दोन) किंवा कार्यकारी अभियंते (वर्ग एक) यांची नियुक्ती करणे कायदेशीर असेल :

परंतु अशा व्यक्तींच्या सेवेच्या अटी व शर्ती, त्यांच्या अशा पदस्थापनेच्या निकटपूर्वी त्यांना लागू असलेल्या अटी व शर्तीपेक्षा कमी फायदेशीर नसतील.

(दोन) उप-खंड (१) अन्वये जिल्हा परिषदेमध्ये पदस्थापना करण्यात आलेल्या अशा अभियंत्यांची वेतने व भत्ते जिल्हा निधीतून देण्यात येतील. "

(२) समास टीपेमध्ये, " राज्य अधिका-यांचे " या मजकुरानंतर, " महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अभियंत्यांचे " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

३. **सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ यात कलम २४२ ब समाविष्ट करणे.---**मुख्य अधिनियमाच्या कलम २४२ ब नंतर पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :-

**जिल्हा तंत्र सेवा (वर्ग तीन) च्या विवक्षित कर्मचा-यांची महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामध्ये नेमणुकीसाठी पात्रता**

" २४२ ब (१) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या अभियंते (वर्ग दोन) च्या सेवा प्रवेश विनिमांन्व्ये, जिल्हा तंत्र सेवा (वर्ग तीन) च्या कर्मचा-यांना उक्त अभियंता संवर्ग दोनच्या सेवेत नेमले जाण्यास पात्र करण्यात येईल त्याबाबतीत, जिल्हा परिषदेस, आपल्या सेवांची निकड लक्षात घेऊन आणि राज्य शासन आणि संबंधित कर्मचारी यांच्याशी विचारविनिमय केल्यावर, राज्य शासनाने, अशा नेमणुकीच्या दिनांकापासून एका वर्षापेक्षा आधी तयार केली नसेल अशा, जिल्हा तंत्र सेवा (वर्ग तीन) च्या कर्मचा-यांच्या निवडसूचीतून, प्राधिकरणाच्या आस्थापनेवर अशा कर्मचा-यांची लेखी आदेशाव्दारे नेमणूक करण्यास मान्यता देता येईल :

परंतु असे की, अशा कोणत्याही कर्मचा-याने संबंधित जिल्हा परिषदेकडे केलेली कोणतीही सेवा ही, प्राधिकरणाकडे केलेली सेवा आहे असे समजण्यात येईल.

(२) याबाबतीत राज्य शासनाने जारी केलेल्या निदेशांचे अनुपालन करणे हे प्राधिकरण व जिल्हा परिषदांचे कर्तव्य असेल. "

सन १९७६ चा महा. ४८

**४. सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४८ यात कलम २२ अ समाविष्ट करणे.----** महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अधिनियम, १९७६ याच्या कलम २२ नंतर पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :---

अनुक्रमे जिल्हा परिषद व प्राधिकरणामध्ये अभियंत्यांचे पदस्थापना व नियुक्ती करणे.

" २२अ. (१) राज्य शासनाने निदेश जारी केल्यावर प्राधिकरण, महाराष्ट्र जिल्हा परिषदा अनुक्रमे व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ अन्वये रचना करण्यात आलेल्या जिल्हा परिषदेमध्ये काम करण्यासाठी, जिल्हा परिषदेमधील सेवांची निकड लक्षात घेऊन, आपल्या अभियंत्यांच्या संवर्गातील, उप अभियंता (श्रेणी-दोन) व कार्यकारी अभियंता (श्रेणी-एक) यांची, प्राधिकरण व संबंधित जिल्हा परिषद यांच्याकडून ठरवण्यात येईल अशा कालावधीकरिता व अशा अटी व शर्तींवर, वेळोवेळी, पदस्थापना करील :

परंतु असे की, अशा व्यक्तींच्या सेवेच्या अटी व शर्ती, अशा पदस्थापनेच्या लगतपूर्वी त्यांना लागू असलेल्या सेवाविषयक अटी व शर्तींपेक्षा कमी फायदेशीर नसतील.

(२) प्राधिकरण, जिल्हा तंत्र सेवा (वर्ग-तीन) चे कर्मचारी प्राधिकरणाच्या आस्थापनेवर नियुक्तीकरिता पात्र व्हावेत म्हणून राज्य शासनाशी विचारविनिमय करुन, आपल्या अभियंता (श्रेणी-दोन) च्या पदांच्या सेवाप्रवेश विनियमामध्ये, विनिर्दिष्ट तरतूद करील, आणि राज्य शासन, जिल्हा तंत्र सेवा (वर्ग-तीन) च्या कर्मचा-यांची, पदांवर नियुक्ती करता येण्यासाठी, अशा कर्मचा-यांची निवडसूची तयार करील.

(३) प्राधिकरणाच्या अभियंता श्रेणी दोनकरिता असलेल्या सेवाप्रवेश नियमावलीनुसार त्यामध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे जिल्हा तंत्र सेवा (वर्ग-तीन) चे कर्मचारी अशा अभियंता (श्रेणी-दोन) च्या सेवेत नेमले जाण्यास पात्र केले जातील. त्या बाबतीत, प्राधिकरण किंवा त्याने त्या बाबतीत प्राधिकृत केलेला अधिकारी, राज्य शासन व संबंधित कर्मचा-याशी विचारविनिमय करुन आणि प्राधिकरणामधील तसेच जिल्हा परिषदांतील सेवेची निकड लक्षात घेऊन, राज्य शासनाने अशा नियुक्तीच्या दिनांकापासून एका वर्षाच्या आधी तयार केली नसेल अशा, जिल्हा तंत्र सेवा (वर्ग-तीन) च्या कर्मचा-यांच्या निवडसूचीमधून, लेखी आदेशाव्दारे, वेळोवेळी, प्राधिकरणामध्ये अशा कर्मचा-यांची नियुक्ती करील.

(४) प्राधिकरणाच्या अभियंता, श्रेणी-दोनच्या सेवेमध्ये नियुक्त केलेले जिल्हा तंत्र सेवा (वर्ग-तीन) चे कर्मचारी, प्राधिकरणाचे अधिकारी असतील आणि उक्त पदांकरिता प्राधिकरणाने ठेवलेल्या सेवेच्या शर्तींव्दारे त्यांच्या सेवा नियंत्रित केल्या जातील.

परंतु असे की, अशा कोणत्याही कर्मचा-याने संबंधित जिल्हा परिषदेकडे केलेली अशी कोणतीही सेवा ही, प्राधिकरणाकडे केलेली सेवा आहे असे समजण्यात येईल.

(५) या बाबतीत राज्य शासनाने जारी केलेल्या निदेशांचे अनुपालन करणे हे प्राधिकरण व जिल्हा परिषदांचे कर्तव्य असेल. "

## निवेदन

राज्य शासनाने इ. स. २००० पर्यंत सर्वांना पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्याच्या बाबीस सर्वोच्च प्राधान्य दिले असून तसा संकल्प सोडला आहे. या प्रयोजनार्थ, मंत्रालय पातळीवर स्वतंत्र पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग निर्माण करण्यात आला असून क्षेत्रीय पातळीवर या कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्याकरिता, स्वतंत्र कार्यकारी यंत्रणा स्थापन करण्यात आली आहे. पिण्याचा पाणी पुरवठा कार्यक्रमासाठी, पाणी पुरवठा आणि स्वच्छता विभागाच्या प्रशासनिक नियंत्रणाखाली जिल्हा परिषद स्तरावर एकंदर १७ विभाग आणि १०३ उप विभाग कार्यरत आहेत.

२. यापूर्वी, ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाची जबाबदारी ग्रामविकास व जलसंधारण विभागाच्या नियंत्रणाखालील लहान पाटबंधारे विभाग/उप-विभाग यांच्याकडे आणि नागरी पाणी पुरवठा कार्यक्रमाची जबाबदारी नगरविकास विभागाकडे होती. या दोन्ही ग्रामीण आणि नागरी योजनांची अंमलबजावणी व आखणी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने (पूर्वीचे नाव महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिःस्सारण मंडळ) केली होती.

३. सामान्यतः, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग आणि उप विभाग यांमध्ये काम करणारा कर्मचारी वर्ग त्या त्या जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिका-याच्या प्रशासनिक नियंत्रणाखाली होता. तथापि, लहान पाटबंधारे विभागातील उप अभियंता आणि कार्यकारी अभियंता या पदावरील नियुक्त्या पाटबंधारे विभागाकडून करण्यात येत होत्या. उप अभियंत्याची नियुक्ती, नामनिर्देशनाने व पदोन्नतीने त्याचप्रमाणे जिल्हा परिषदेच्या कनिष्ठ अभियंत्यामधून निवड करुन केली जाई. हे काम सुकर करण्यासाठी जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ याच्या कलम २३९ आणि कलम २४२ ब मध्ये यापूर्वीच योग्य त्या तरतुदी करण्यात आल्या आहेत. तथापि, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग या स्वतंत्र विभागाच्या निर्मितीनंतर ग्रामीण पाणी पुरवठयाचे विभाग आणि उप विभाग यांवरील उप अभियंता आणि कार्यकारी अभियंता यांची नियुक्ती आता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, पिण्याच्या पाणी पुरवठा प्रकल्पामधील विशेषज्ञ असल्यामुळे, त्या प्राधिकरणाकडून करण्यात यावयाची आहे. परंतु, अशी नियुक्ती करण्याच्या दृष्टीने विद्यमान महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या अधिनियम, १९६१ आणि महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अधिनियम, १९७६ यामध्ये कोणत्याही तरतुदी नाहीत. म्हणून, अशा नियुक्त्यांचे काम सुलभ करण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ आणि महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अधिनियम, १९७६ यात सुधारणा करुन त्यात योग्य त्या समर्थकारी सांविधिक तरतुदी करणे आवश्यक आहे.

४. राज्य विधान मंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही, आणि पूर्वोक्त प्रयोजनांसाठी त्यासंबंधातील योग्य त्या तरतदी करण्याकरिता, महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अधिनियम, १९७६ यात तात्काळ आणखी सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी त्वरीत कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे म्हणून, हा अध्यादेश प्रख्यापित करण्यात येत आहे.

मुंबई,
दिनांक १३ नोव्हेंबर, १९९८

**पी. सी. अलेक्झांडर,**
महाराष्ट्राचे राज्यपाल

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**व्ही. रंगनाथन,**
शासनाचे अपर मुख्य सचिव